।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## EXAMINATIONS SECTION

Phone: (02462) 229294 website: srtmun.ac.in e-mail: directorboee@gmail.com

संदर्भ : परीक्षा/अभियांत्रिकी/२०२०-२१/६०५ दिनांक : १२/११/२०२०

**उन्हाळी २०२० परीक्षेबाबत महत्वाचे परीपत्रक**

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ

विषय : अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या उन्हाळी २०२० परीक्षेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या दिनांक १०/११/२०२० रोजी संपन्न झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीमधील ठरावानुसार अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या कॅरीऑन अंतर्गत (Old, New, Revised, CGPA) प्रवेशीत व अनियीमत (Backlog) विद्यार्थ्यांची ज्यांनी उन्हाळी २०२० परीक्षेसाठी परीक्षा आवेदन पत्र सादर केलेली आहेत अशाच विद्यार्थ्यांची परीक्षा महाविद्यालय स्तरावर खालील प्रमाणे घेणेबाबत निर्णय झालेला आहे. सबब या निर्णयानुसार प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व अभियांत्रिकी महाविद्यालय प्राचार्यांनी खालीलप्रमाणे महाविद्यालय स्तरावर परीक्षा घेण्याबाबतची कार्यवाही करावी ;

- अभियांत्रिकी प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या कॅरीऑन देण्यात आलेल्या सर्व अभ्यासक्रमाच्या व अनियीमत (Backlog) विद्यार्थ्यांची उन्हाळी २०२० परीक्षा महाविद्यालय स्तरावर दिनांक ०२/१२/२०२० ते १५/१२/२०२० दरम्यान आयोजित करण्यात याव्यात.
- सदर परीक्षेकरीता प्रश्नपत्रिका बहुपर्यायी स्वरुपात ५० प्रश्नांची असावी. त्यापैकी ४० प्रश्न सोडविणे विद्यार्थ्याकरीता अनिवार्य असेल. प्रत्येक प्रश्नास ०१ गुण याप्रमाणे एकुण ४० गुणांची असेल. सदर परीक्षा ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने घेण्यात याव्यात. या परीक्षेच्या प्रत्येक प्रश्नपत्रिकेसाठी एक तासाचा कालावधी असेल.
- वरील प्रश्नपत्रिकेनुसार विद्यार्थ्यांस प्राप्त होणारे ४० पैकी गुण हे त्या त्या विषयास असलेल्या कमाल गुणांनुसार विद्यापीठाच्या परीक्षा विभागामार्फत निकाल जाहीर करताना रुपांतरीत करण्यात येतील.
- सदर परीक्षेकरीता विद्यापीठाने पुरविलेल्या मूळ एम.सी.क्यु. उत्तरपत्रिका (OMR) वापरण्यात याव्यात.
- सदर उत्तरपुस्तिकेचे मुल्यांकन महाविद्यालयामध्ये परीक्षा झाल्याच्या दुसरे दिवशी पुर्ण करण्यात येवुन सदर गुण विद्यापीठ संकेतस्थळावरील ऑनलाईन पोर्टलवर भरुन द्यावेत व त्या गुणयादीची एक प्रिंटआऊट काढुन त्यावर संबंधीत परीक्षक व प्राचार्याची स्वाक्षरी करावी व ही स्वाक्षरी असलेली गुणयादी विद्यापीठात सादर करावी.

- संबंधीत परीक्षेचे वेळापत्रक व अभ्यासक्रमनिहाय/सत्रनिहाय प्रश्नपत्रिका, उत्तरतालिका, गुणयाद्यांची प्रत व उपस्थिती अहवाल सिलबंद पाकिटामध्ये सर्व परीक्षा संपल्यानंतर तीन दिवसात विद्यापीठामध्ये सादर करावेत. तसेच उत्तरपुस्तिकांचे मूल्यांकन झाल्यानंतर त्या विषयाच्या सर्व उत्तरपुस्तिका एका पाकिटामध्ये टाकून त्यासोबत त्या विषयाची प्रश्नपत्रिका, उपस्थिती अहवाल टाकावा व ते पाकिट सिलबंद करुन पाकिटावरती महाविद्यालयाचा संकेतक्रमांक, वर्ग/सत्र, विषय, एकूण उत्तरपुस्तिकांची संख्या अशी नोंद करावी. ही सर्व पाकिटे महाविद्यालयामध्ये मूल्यांकन होईपर्यंत सुरक्षित ठेवुन सर्व परीक्षा संपल्यानंतर तीन दिवसापर्यंत विद्यापीठामध्ये जमा करावित. या बाबीचा सर्व आढावा विद्यापीठ स्तरावर करण्यात येईल व संबंधीत परीक्षेचे निकाल विद्यापिठामार्फत जाहीर करण्यात येतील व गुणपत्रिका वितरीत करण्यात येतील.
- सदर परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण/अनुपस्थित राहणा-या परीक्षार्थ्यांची पुन्हा अतिरीक्त परीक्षा होणार नाही. अशा विद्यार्थ्यांना आगामी हिवाळी २०२० परीक्षा देता येईल.
- सदर परीक्षेकरीता नव्याने परीक्षा आवेदनपत्र सादर करता येणार नाहीत.
- **कॅरीऑन अंतर्गत प्रवेशित व अनियमीत (Backlog) तृतीय वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यास उन्हाळी २०२० परीक्षा देताना प्रथम वर्ष उत्तीर्ण असणे व द्वितीय वर्षामध्ये एटीकेटी/उत्तीर्ण असणे तसेच द्वितीय वर्षासाठी परीक्षा देण्याकरीता प्रथम वर्ष एटीकेटी/उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.**

यासंदर्भात परीक्षा विभागाचे परीपत्रक क्र. परीक्षा/अभियांत्रिकी/२०२०-२१/५६८ दि. ०३/११/२०२० रद्द करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे उन्हाळी २०२० परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेणेबाबत नोंद घेऊन ही बाब सर्व संबंधीत शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणून द्यावी व या परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे.

(डॉ. रवि एन. सरोदे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति माहितीस्तव :

०१. मा. कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
०२. मा. प्र-कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
०३. मा. अधिष्ठाता/सहयोगी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ